**गट स्तरावरील वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांच्या (पर्यवेक्षकीय) कर्मचा-यासह मुख्यालयातील अनावश्यक फिरती बाबत.**

**परिपत्रक**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम

परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/७९८/२०१८

दिनांक :२७ फेब्रुवारी २०१८

**<u>प्रस्तावणा :-</u>**

जिल्हा परिषदेमध्ये असे दिसनु आले की गट स्तरावरील कार्यालयीन कर्मचारी, शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, तसेच जि.प.मधिल इतर कर्मचारी शासकिय कामकाज नसतांना त्यांचे कार्यालय सोडुन जिल्हा परिषद मधिल कार्यालयात फिरतांना दिसुन येतात त्यामुळे गट स्तरावरील कामे प्रलंबीत राहतात, व गट स्तरावरील जनतेची कामे रखडुन राहतात तसेच गट स्तरावरील वर्ग ३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचारी,शिक्षण देखील) मुख्यांलयात शासकिय कामकाजासाठी मोठया प्रमाणात येत असल्याचे निदर्शनास येते, परंतु त्यांचेकडील कामकाजाची कोणत्याही प्रकारची पर्यायी व्यवस्था न करता सदरचे कर्मचारी मुख्यालयांत फिरतीवर येतात. (उदा.०१) एक शिक्षकी शाळेवरील सबंधित उपशिक्षक शासकिय कामकाजासाठी मुख्यालयांत आल्यास,तेथील विद्यार्थ्याचे शैक्षणीक नुकसान होते.) पर्यवेक्षकीय कामकाज करणारे कनिष्ठ अभियंता,स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक, विस्तार अधिकारी,(ग्रां.प./उद्योग) (आरोग्य,) कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक इ.संवर्गाच्या फिरतीमुळे स्थानिक नागरीकांना कामकाजासबंधात अडचणी निर्माण होतात, परिणामी स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांच्या रोषाला सामोरे जावे लागते.सदर बाबीवर नियत्रण ठेवणे आवश्यक असल्याने याबाबत खालील प्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे

## परिपत्रक:-

गट स्तरावरील वर्ग ३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचा-यांसह,शिक्षकासह) व वर्ग ४ चे कर्मचारी मुख्यालयांत कोणत्याही प्रकारचे शासकिय कामकाजाकरिता येणे आवश्यक असल्यास त्याबाबत गट स्तरावरील गट विकास अधिकारी/ गट शिक्षणाधिकारी यांचेकडुन टिपणी मंजुर करुन घेऊन दौ-यावर पाठवावे तसेच ज्या कामाकरिता दौ-यावर ज्या विभागामध्ये आले असतील ते काम करुन कधि परत गेले याबाबतचे संबंधित कार्यालयातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी / सहाय्यक प्रशासन अधिकारी संबंधित कार्यालय प्रमुख यांचे प्रमाणपत्र घेण्यात यावे असे प्रमाणपत्र असल्याशिवाय संबंधिताचे वेतन व भत्ते अदा करण्यात येऊ नये

जिल्हा परिषद शाळेमधिल शिक्षक, यांना वैयक्तिक कामाकरिता जिल्हा स्तरावर यावायाचे असल्यास तसा रितसर रजेचा अर्ज देऊन,त्यामध्ये ज्या कामाकरिता जि.प.स्तरावर येत आहे त्यांचा उल्लेख करुनच यावे याबाबत गट शिक्षणाधिकारी यांनी नियत्रण ठेवावे.

तसेच गटविकास अधिकारी,/ गट शिक्षणाधिकारी ,पंचायत समिती (सर्व) यांनी कोणत्याही वर्ग ३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचा-यांसह,शिक्षकासह) व वर्ग ४ चे कर्मचारी यांना शुल्लक कारणासाठी मुख्यालयांत पाठवु नये, अत्यंत महत्वाचे कामकाज असल्यास ,सदरच्या कर्मचा-यास गटविकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व) यांनी त्यांचे परवानगीसह पाठविणेत यावे. अत्यंत महत्वाच्या कामासाठी मुख्यालयांत आलेल्या कर्मचा-यांसाठी जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांनी त्यांचे कार्यालयांत नोंदवही ठेवावी व सदरच्या नोंदवहीमध्ये कार्यालयामध्ये आलेल्या प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची नोंद घेऊन अद्यावत ठेवण्यात यावे यांची नोंद घ्यावी (गट स्तरावरील फिरतीवर आलेले कर्मचा-यांकडून सदरची नोंद त्यांचे स्वाक्षरीसह नोंदवून घ्यावी.)

सदरच्या परिपत्रान्वये उपरोक्त सूचना देऊन देखील वर्ग ३ चे कर्मचारी (पर्यवेक्षीय कर्मचा-यासह ) व वर्ग ४ चे कर्मचारी यांना शुल्लक कारणासाठी मुख्यालयांत फिरतीवर असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरच्या कर्मचा-याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, सेवा शिस्त व अपिल नियम १९६४ मधिल तरतुदी नुसार एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल.

सदर परिपत्रक सर्व संबंधीतांना निर्दशनास आणुन देऊन तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

प्रति,

१) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम
२) गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - - (सर्व)
३) सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - -(सर्व)
४) गटशिक्षणाधिकारी ,पंचायत समिती सर्व - - - - - - - - - - - - (सर्व)
५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो. - - - - - - - - - - (सर्व)
६) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती सर्व - - - - - - -
७) तालुका वैद्यकिय अधिकारी - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व)
८) वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केद्र - - - - - - - - - - - (सर्व)
९) वैद्यकिय अधिकारी,आयुर्वेइकि दवाखाने सर्व - - - - - - - - - - -
१०) उपअभियंता (लसि/ग्रापापु/बांध) उपविभाग - - - - - - - - - - - (सर्व)
११) मुख्याध्यापक जि.प.विद्यायल - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व)

22/02

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम